**मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २०/११/२०१८ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या १ ल्या बैठकीचे इतिवृत्त**

---

मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षेखाली दिनांक २०/११/२०१८ रोजी जिल्हास्तरीत कांदळवन व संरक्षण व संवर्धन समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे समितीचे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १. | जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख रायगड | सही/- |
| २. | उप वनसंरक्षक अलिबाग | सही/- |
| ३. | उप वनसंरक्षक रोहा | सही/ |
| ४. | पोलीस उप अधिक्षक (गृहविभाग)अलिबाग | सही/ |
| ५ | उपआयुक्त, महानगर पालिका पनवेल | सही/ |
| ६. | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद | सही/ |
| ७. | सहाय्यक संचालक नगर रचनाकार रायगड अलिबाग | सही/ |
| ८. | महाव्यवस्थापक,(पर्यावरण व वने) सिडको | सही/ |
| ९ | उपविभागीय अधिकारी अलिबाग | सही/ |
| १० | उपविभागीय अधिकारी पेण | सही/ |
| ११ | उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे प्रतिनिधी | सही/ |
| १२ | उपविभागीय अधिकारी माणगाव | सही/ |
| १३ | उपविभागीय अधिकारी रोहा | सही/ |
| १४ | उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन | सही/ |
| १५ | उपविभागीय अधिकारी महाड | सही/ |
| १६ | उपविभागीय अधिकारी कर्जत | सही/ |

उपस्थित सदस्यांचे मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी स्वागत करुन सभेस सुरुवात करण्यात आली. सभेमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रिटपिशन नं ८७/२००६ मध्ये दिनांक १७/९/२०१८ रोजी निर्णय दिला असुन सदर निर्णयामध्ये कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी उपाय योजना करण्यासंदर्भात कालबध्द कार्यक्रम आखुन देण्यात आला आहे. मा. उच्च न्यायालयाने दिनांक १७ सप्टेबर २०१८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक १६ आक्टोबर २०१८ अन्वये कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली संनियत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक ३/११/२०१८ अन्वये मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय व उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तालुका स्तरावर समिती स्थापन करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

मा. विभागीय आयुक्त यांचेकडील निर्देशानुसार या कार्यालयाकडून दिनांक १६/११/२०१८ रोजीचे आदेशान्वये जिल्हास्तरीय/तालुकास्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून आदेशाच्या प्रती यापूर्वीच निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर जिल्हास्तरी समितीमध्ये खालीलप्रमाणे अधिका-यांचा समितीचे सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे असे सांगण्यात आले.

| अ.क्र. | अधिका-यांचे पदनाम | समितीतील स्थान |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी रायगड | अध्यक्ष |
| २ | उप वनसंरक्षक अलिबाग | सदस्य सचिव |
| ३ | उप वनसंरक्षक रोहा | सदस्य |
| ४ | जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख रायगड | सदस्य |
| ५ | उपविभागीय अधिकारी सर्व | सदस्य |
| ६ | पोलीस उप अधिक्षक (गृहविभाग)अलिबाग | सदस्य |
| ७ | पोलीस उपआयुक्त परीमंडळ - २, पनवेल | सदस्य |
| ८ | उपआयुक्त, महानगर पालिका पनवेल | सदस्य |
| ९ | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद | सदस्य |
| १० | सहाय्यक संचालक नगर रचनाकार रायगड अलिबाग | सदस्य |
| ११ | प्रादेशीक अधिकारी महारष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ सीबीडी बेलापूर | सदस्य |
| १२ | महाव्यवस्थापक,(पर्यावरण व वने) सीडको | सदस्य |

उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तालुका स्तरावर कांदवन संरक्षण व संवर्धन समित्या गठी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार उपविभागीय अधिकारी यांनी दरमहा तालुकास्तरी समितीची बैठक आयोजीत करुन कांदळवन तक्रारीचा आढावा घ्यावा. कांदळवन तोडीच्या यापुर्वी प्राप्त झालेल्या तक्रारीपैकी १० तक्रारी प्रलंबित आहेत. उपविभागीय अधिकारी पनवेल यांच्याकडे ९ तक्रारी व उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याकडे १ तक्रार प्रलंबित आहेत. उपविभागीय अधिकारी पनवेल व अलिबाग यांनी सदर तक्रारीचा चौकशी अहवाल ३० नोव्हेबर २०१८ पर्यत न चुकता सादर कराव्यात अशा सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

सन २००६च्या MRSAC नकाशानुसार कांदळवनाचे क्षेत्र अधिसुचीत करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. MRSAC नकाशानुसार कांदळवनाचे काही क्षेत्र अधिसुचीत करण्याचे शिल्लक असल्यास ते अधिसुचीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी. आपल्या जिल्हयात अधिसुचीत करण्यात आलेल्या क्षेत्रापैकी अलिबाग, मुरुड व रोहा व म्हसळा तालुक्यामधील २०३.२६ हेक्टर कांदळवन क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात देण्याचे शिल्लक आहे. माहे नोव्हेबर-२०१८ अखेर सदरचे क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी अशा सुचना दिल्या.

पनवेल ब उरण तालुक्यातील बरेचशे कांदळवनाचे क्षेत्र सिडकोच्या कार्यक्षेत्रात आहे. सदर क्षेत्रापैकी किती क्षेत्र वळतीकरण झाले व किती क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे याची महिती सिडकोकडे उपलब्ध आहे काय याबाबत सिडकेचे प्रतिनिधी श्री. पाटील यांना विचारणा केली . त्यावर वळतीकरणाचे क्षेत्र उपलब्ध आहे परंतू अतिक्रमण केलेले तसेच भराव केलेल्या क्षेत्राची माहिती नसल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले. सिडकोकडून ब-याच जमिनी विकासकाला वाटप करण्यात आल्या आहेत तसेच कांदळवन तोडीच्या ब-याच तक्रारी हया सिडको हद्दीतील आहेत. त्यामुळे कांदळवनाचे वळतीकरणाचे क्षेत्र किती व अतिक्रमणाचे क्षेत्र किती याची माहिती पुरविण्याबाबत सिडकोचे अधिकारी यांना मा. जिल्हाधिकारी यांनी सुचना दिल्या.

उप वनसंरक्षक अलिबाग यांनी पेण व अलिबाग तालुक्यातील कांदळवन अधिसुचीत करण्यात आलेल्या कांदळवनाचे नकाशे वेळोवेळी मागणी करुनही उपविभागीय अधिकारी यांचेकडून मिळत नसल्याचे सांगितले. याबाबत उपविभागीय अधिकारी पेण व अलिबाग यांना विचारणा करण्यात आली असता त्यांच्याकडे नसल्याचे उपविभागीय अधिकारी पेण व अलिबाग यांनी

सांगितले. त्यावर जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख रायगड यांना अलिबाग व पेण तालुक्यातील अधिसुचीत कांदळवनाचे नकाशे पुरविण्याबाबत सांगण्यात आले.

कांदळवन तोडीच्या प्राप्त झालेल्या तक्रारी संदर्भात तलाठी / मंडळ अधिकारी यांच्यामार्फत चौकशी केली जाते. परंतू सदर चौकशीची कार्यवाही वेळेत होत नाही. उशिरा चौकशी केल्यामुळे जागेवर तोड करणारी व्यक्ती मिळून येत नाही. ही बाब टाळण्यासाठी कांदळवन तोडीची तक्रार प्राप्त झाल्याबरोबर ४८ तासाच्या आत तहसिलदार यांनी स्वतः स्थळपहाणी करावी. व कांदळवन तोड झाल्याचे निर्दशनास आल्यास उपविभागीय अधिकारी यांनी पर्यावरण अधिनियम १९८६ मधील १९अ नुसार १ महिन्याच्या आत कोर्टात तक्रार (Complaint) दाखल करण्याची कार्यवाही करावी

मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कांदळवन जमिनीपासुन ५० मीटर परिसरात कोणत्या प्रकारचे बांधकाम/ विकासकाम करता येणार नाही. बांधकाम परवानगीसाठी सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडून अभिप्राय मागविण्यात येतात . यापुढे अशा प्रकरणी प्रत्यक्ष जागा पहाणी करुन मागणी क्षेत्रात किंवा ५० मीटर क्षेत्रात कांदळवन आहे काय याबाबतच्या अभिप्रायासह अहवाल सदर सहाय्यक संचालक नगर रचना रायगड यांना सुचना दिल्या.

सर्व उपविभागीय अधिकारी यांनी तालुका स्तरीय समितीच्या दरमहा नियमीत बैठका घेऊन बैठकीचे इतिवृत्त न चूकता सादर करण्यात यावे अशा सुचना देण्यात आल्या.

सदर बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांचे आभार मानुन बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची असे)

(विशाल दौंडकर)
तहसिलदार (महसुल)
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड